<u>कुस्ती कलेचा विकास</u>
माती व गादी विभागातील कुस्तीगीरांना
द्यावयाच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : क्रीडायो-२०१२/(प्र.क्र.६४/१२)/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २१ डिसेंबर, २०१२.

<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-पीएचई १०९३/प्र.क्र.१४८/क्रीयुसे-१, दिनांक १७ सप्टेंबर, १९९४
(२) शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो १०९६/प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१, दिनांक ३१ जुलै, १९९७

<u>प्रस्तावना</u> :- राज्यातील कुस्ती कलेची परंपरा जोपासण्यासाठी तसेच कुस्तीगीरांच्या गुणांचा विकास होण्याच्या दृष्टीने त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मानधन देण्याची योजना राबविण्यात येत असून त्यानुसार माती व गादी विभागातील वजन गटनिहाय प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगीरांना तसेच सहा क्रमांकानंतरच्या सहभागी होणाऱ्या सर्व कुस्तीगीरांना संदर्भ क्र.२ येथील दिनांक ३१ जुलै, १९९७ च्या शासन निर्णयान्वये वजन गटनिहाय मानधन देण्यात येते. माती व गादी विभागातील कुस्तीगीरांना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याची महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेची विनंती शासनाच्या विचाराधीन होती व त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

:<u>शासन निर्णय</u> : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत आयोजित कुस्ती अधिवेशनातील माती व गादी विभागातील सुधारित वजन गटनिहाय प्रथम सहा क्रमांकाच्या प्राविण्यप्राप्त कुस्तीगीरांना तसेच सहा क्रमांकानंतरच्या सहभागी होणाऱ्या सर्व कुस्तीगीरांना सोबतच्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे सुधारित दराने मासिक मानधन देण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्रमांक-प्र.क्र.२९४/१२/व्यय-५, दिनांक ५/०५/२०१२) निर्गमित करण्यात येत आहे.

४. यावर होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ (०८)(०१) कुस्ती खेळाचा विकास यासाठी आर्थिक सहाय्य (२२०४ १६४ ९) ३४ शिष्यवृत्या/विद्यावेतने योजनेतर" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखालील मंजूर तरतूदीमधून मागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक- २०१२१२२११५१६०७८१२१** आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि.शां.परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(२) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(३) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(४) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
(६)सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, (संचालनालयामार्फत)
(७) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (संचालनालयामार्फत)
(८) मा.मंत्री (क्रीडा)/मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
(९) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
(१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(११) अवर सचिव क्रीयुसे-१/क्रीयुसे-३
(१२) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

परिशिष्ट

शासन निर्णय, क्र.क्रीडायो २०१२/प्र.क्र.(६४/२०१२),क्रीयुसे-२, दिनांक :- २१ डिसेंबर, २०१२ चे सहपत्र

| वरिष्ठ गट (फ्रिस्टाईल) गादी विभागातील प्राविण्य प्राप्त व सहभागी कुस्तीगीरांसाठी वजन गटनिहाय सुधारित मानधन दराचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राविण्यधारक प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगीरांना दरमहा मानधन रुपये | | | | | | | सहाव्या क्रमांकानंतरच्या सर्व सहभागी कुस्तीगीरांना दरमहा मानधन रुपये |
| वजन गट | प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | पाचवा | सहावा | |
| ५५ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ६० | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ६६ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ७४ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ८४ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ९६ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| म.केसरी | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |

| वरिष्ठ गट (फ्रिस्टाईल) माती विभागातील प्राविण्य प्राप्त व सहभागी कुस्तीगीरांसाठी वजन गटनिहाय सुधारित मानधन दराचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राविण्यधारक प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगीरांना दरमहा मानधन रुपये | | | | | | | सहाव्या क्रमांकानंतरच्या सर्व सहभागी कुस्तीगीरांना दरमहा मानधन रुपये |
| वजन गट | प्रथम | व्दितीय | तृतीय | चतुर्थ | पाचवा | सहावा | |
| ५५ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ६० | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ६६ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ७४ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ८४ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| ९६ | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |
| म.केसरी | २४०० | २२०० | २००० | २००० | १६०० | १४०० | १००० |